आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

# School Leadership Academy, Maharashtra

# मोड्यूल क्र.१८

# ठाणे जिल्ह्यातील एचआयव्ही बाधित मुलांच्या शैक्षणिक विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका

# The Role of School Leadership in Educational Development of HIV Positive Children in Thane District

**प्रस्तावना -**

शिक्षण ही एक सार्वजनिक सेवा आहे, दर्जेदार शिक्षण मिळणे हा प्रत्येक बालकाचा मूलभूत अधिकार आहे, असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तत्वांमध्ये नमूद केलेले आहे. त्यानुसारच एचआयव्ही बाधित मुलांना शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.

विशेष गरजा असणाऱ्या बालकांमध्ये एचआयव्ही बाधित मुलांचा समावेश केलेला आहे. या मुलांना शिक्षण घेताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. एचआयव्ही बाधित पालकांचे निधन होऊन ती अनाथ झालेली आहेत किंवा एकल पालकत्व असलेली आहेत. बरेचवेळा शिक्षण घेताना शाळा, शिक्षक, इतर विद्यार्थी व समाज यांचे योग्य सहकार्य मिळत नाही. त्यामुळे ही मुले समाजातल्या आणि शाळेतल्या भेदभावाच्या वागणुकीचा बळी ठरतात किंवा त्यांना प्रवेश नाकारला जातो. या सर्वांचा परिणाम त्यांच्या शिक्षणावर होतो व ती हतबल होऊन शाळा सोडतात. शिक्षणात प्रगती व बुद्धिमत्ता असूनही त्यांना शिक्षणाला मुकावे लागणे ही खूप मोठी शोकांतिका आहे. अशा मुलांना शिक्षण आणि आसरा देण्यासाठी शासन व स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. कित्येक मुलांना समाजाने नाकारल्याने ही मुले स्वयंसेवी संस्थेमध्ये राहून शिक्षण घेत आहेत.

ठाणे जिल्ह्यात काम करत असताना अनेक उपक्रमांबाबत विविध शाळांना भेटी दिलेल्या आहेत. नवी मुंबई म.न.पा. या क्षेत्रातील न.मुं.म.न.पा. शाळा क्र. २८ ला भेट दिली असता, HIV बाधित मुलांविषयी माहिती मिळाली. असाध्य अशा रोगाशी सामना करत, ही मुले शिक्षण घेत आहेत. ही बाब खूपच विशेष आहे. त्यामुळे मी त्यांच्या विषयी माहिती काढली. प्रत्यक्ष डीझायर स्वयंसेवी संस्थेशी संपर्क साधला व त्या संस्थेत जावून त्यांची भेट घेतली . त्यांच्याकडून या मुलांबाबत माहिती घेतली. या मुलांना शिक्षण देण्यासाठी त्यांना वयानुरूप शाळांमध्ये दाखल करून घेतले जात आहे. तसेच त्यांचा शैक्षणिक विकास व्हावा व त्यांची प्रगती व्हावी यासाठी शालेय नेतृत्व व शिक्षक मेहनत घेत आहेत. या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी काम करणाऱ्या शालेय नेतृत्वाचा अभ्यास या मोड्यूल अंतर्गत करण्यात आलेला आहे.

एचआयव्ही बाधित मुलांसाठी अनेक स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी डीझायर या स्वयंसेवी संस्थेमध्ये आसरा घेवून शिक्षण घेत असलेल्या एचआयव्ही बाधित मुलांची माहिती खालील प्रमाणे

**सन २०२१-२२ मधील ३ ते २३ या वयोगटातील मुलांची संख्या-**

| अ.क्र. | जिल्हा | लिंग | वयोगट ३ ते २३ |
|---|---|---|---|
| १ | मुंबई उपनगर | मुली | २३ |
| २ | ठाणे | मुले | २२ |
| एकूण | | | ४५ |

(स्त्रोत– डीझायर स्वयंसेवी संस्था)

डीझायर स्वयंसेवी संस्थेमार्फत या मुलांना निवारा, पोषक आहार, डॉक्टरांनी सांगितलेली औषधे दिली जातात. त्याच बरोबर दर तीन महिन्यातून एकदा कपडे व जीवनावश्यक सर्व वस्तुही दिल्या जातात. यासोबत मुलांना जमतील असे संगणक कौशल्ये शिकविले जाते.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे**


१. एचआयव्ही बाधित ही संकल्पना समजून घेणे.

२. एचआयव्ही बाधित मुलांच्या शैक्षणिक विकासाबाबत यशस्वी काम केलेल्या शालेय नेतृत्वाचा अभ्यास करणे.

३. एचआयव्ही बाधित मुलांच्या शैक्षणिक विकासाबाबत शालेय नेतृत्वाचा दृष्टिकोन विकसित करणे.

**एच आय व्ही बाधित - संकल्पना**

प्रतिकार शक्तीच्या अभावाने प्राप्त झालेल्या अनेक रोग लक्षणांचा एकत्रित समूह म्हणजेच एड्स (अॅक्वायर्ड डेफिशियन्सी सिंन्ड्रोम). एड्स हा एचआयव्ही विषाणूमुळे होणारा आजार आहे. एचआयव्ही म्हणजे ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस. मानवाची प्रतिकारशक्ती कमी करणारा विषाणू, एड्सच्या विषाणूचा शोध १९८३ साली डॉ. ब्ल्यूक मोण्टिग्रेअर (फ्रेंच) व डॉ. रॉबी गॅलो (अमेरिकन) या शास्त्रज्ञांनी लावला. जगामध्ये अमेरिकेत एड्सचा पहिला रुग्ण १९८१ साली आढळला. भारतामध्ये १९८६ साली मद्रास (चेन्नई) मध्ये पहिला पॉझिटिव्ह रुग्ण आढळला.





लाल रिबन ही एडस् विरोधी लढाईची खूण आहे.

असुरक्षित लैंगिक संबंध, एचआयव्ही बाधित रुग्णास इंजेक्शन देण्यासाठी वापरलेली सुई दुसऱ्यांनी वापरल्याने, एचआयव्ही बाधित व्यक्तीचे रक्त दुसऱ्या रुग्णाला दिल्याने एचआयव्ही ग्रस्त गरोदर महिलेपासून तिच्या होणाऱ्या बाळाला (नाळेमार्फत), स्तनपानाद्वारे आदि कारणामुळे एचआयव्ही चा प्रसार होऊ शकतो. एचआयव्ही बाधित व्यक्तीशी हस्तांदोलन केल्याने, चुंबन घेतल्याने, एकत्र बसल्याने, जेवल्याने, डास चावल्याने याचा प्रसार होत नाही.

सध्या राज्यातील गरोदर मातांमधील एचआयव्ही संसर्गाचे प्रमाण सव्वा टक्क्यांवरून ०.९ टक्क्यांपर्यंत खाली उतरलेले आहे. लिंगसांसर्गिक आजाराच्या बाह्यरुग्ण विभागात येणाऱ्या रुग्णांपैकी सुमारे १८ टक्के एचआयव्ही बाधित असायचे (१९८८) तर आता त्याचे प्रमाण दहा टक्केपर्यन्त खाली आलेले आहे. स्वतःहून रक्त देणाऱ्यांमध्ये एचआयव्ही प्रमाण पूर्वी १.३५ होते ते आता ०.६६ झालेले आहे.

एड्ससारख्या आजाराबद्दल आणि त्यांच्या संक्रमणाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी ०१ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन पाळला जातो. ऑगस्ट १९८७ मध्ये जेम्स डब्ल्यू बन आणि थॉमस नेटर या दोघांनी वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन जिनेव्हा (स्वित्झर्लंड) येथील जागतिक कार्यक्रमात याची संकल्पना मांडली. त्यानंतर ०१ डिसेंबर १९८८ पासून हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून पाळला जातो.

एचआयव्ही बाधितांना हक्काचे संरक्षण मिळणेसाठी शासनाने एचआयव्ही/ एड्स (प्रतिबंध व नियंत्रण) विधेयक २०१४ मध्ये दुरुस्ती प्रस्तावाला मंजूरी दिली आहे. या दुरुस्तीनुसार एचआयव्ही ग्रस्तांना शिक्षण, रोजगार, वैद्यकीय उपचार, निवास यामध्ये भेदभावाची वागणूक देणाऱ्या व्यक्ती व संस्थाविरुद्ध कारवाईची तरतूद करण्यात आली आहे.

एचआयव्ही बाधित मुले शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांचा समावेश विशेष गरजा असणाऱ्या बालकांमध्ये करण्यात आलेला आहे. विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे एकूण एकवीस प्रकार असून बाविसावा हा इतर प्रकार आहे. या प्रकारामध्ये इतर आजारामुळे शालेय शिक्षणात अडचणी येणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. याच प्रकारातील उपप्रकार दोन मध्ये एचआयव्ही बाधित या आजाराचा समावेश केलेला आहे. एचआयव्ही बाधित मुले ही आजाराने ग्रस्त असल्याने त्यांना शिक्षण घेताना अनेक अडचणी येतात. नियमित औषध घेत असल्यामुळे ते थोडे शांत व ग्लानीत असतात. त्याचा परिणाम त्यांच्या अध्ययन अध्यापनावर होतो. या मुलांनाही शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. या मोड्यूलमध्ये ठाणे जिल्ह्यातील एचआयव्ही बाधित मुलांच्या शैक्षणिक विकासात शालेय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास केलेला आहे.

### एचआयव्ही बाधित मुलांबाबत नेतृत्वासमोर असलेली आव्हाने

एचआयव्ही बाधित मुलांना आजारपणाला तोंड देता देता इतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांना निवारा व संरक्षण याबाबत असलेली अनिश्चितता, संपत्तीमध्ये अधिकार न मिळणे, घरातून व समाजातून मिळणारी वागणूक अशा विविध बाबतीत ती पीडित ठरतात. अशा विविध समस्या असलेल्या मुलांचा शैक्षणिक विकास करून त्यांची गुणवत्ता वाढविणे अशी मोठी आव्हाने शालेय नेतृत्व व शिक्षकांना असतात.

### १. विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने

- एचआयव्ही बाधित मुलांना शाळेत दाखल करून घेणे हे आव्हान असते.
- अनियमित उपस्थितीमुळे गुणवत्ता वाढविणे व प्रगती गाठणे कठीण होते.
- आरोग्याबाबत समस्या असल्याने ती मुले थोडी शांत, ग्लानीत व त्यांचे अवधान केंद्रीकरण कमी असल्याने त्यांना बोलते करणे मोठे आव्हान असते.
- वर्गातील इतर विद्यार्थ्यांमध्ये मिसळणे, स्वतःबाबत असलेला न्यूनगंड कमी करणे.
- विद्यार्थ्यांनी स्वतःची काळजी व निगा राखणे.
- विद्यार्थ्यांचे आरोग्य व मानसिक वर्तन यांचा समन्वय साधणे.

### २. शिक्षकांशी संबंधित आव्हाने

- एचआयव्ही च्या आजाराबाबत / रोगाबाबत असलेली भीती दूर करणे.
- एचआयव्ही मुलांसोबत काम करण्याचा असलेला तणाव कमी करणे.
- या मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे.
- अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत इतर मुलांबरोबर या मुलांचा सहभाग घेणे. हे आव्हान असते.

- शाळेतील सर्व उपक्रमांमध्ये या मुलांना इतर मुलांसोबत सामावून घेणे.

**३. पालकांशी संबंधित आव्हाने**

- ही मुले एकतर अनाथ असतात किंवा एकल पालकत्व असणारी असतात. त्यामुळे त्यांच्या पालकांना त्यांच्या मुलांबाबत मार्गदर्शन करणे.
- भविष्याबाबत व शिक्षणाबाबत या मुलांच्या पालकांना असलेली काळजी किंवा अनास्था दूर करणे.
- स्वतः काही पालक एचआयव्ही बाधित असल्याने त्यांना समाजाकडून व कुटुंबाकडून मिळणारी वागणूक जाणून घेणे.
- मुलांचे पालनपोषण व औषधोपचार यावर येणारा जास्तीचा खर्च त्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला आर्थिक तणाव कमी करणे.
- पालकांच्या मनात त्यांच्या मुलांबाबतची सुरक्षितता व आपुलकी निर्माण करणे.

**४. समाजाशी संबंधित आव्हाने**

- एचआयव्ही या आजाराबाबत / रोगाबाबत जनजागृतीच्या अभावामुळे या मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन काहीसा वेगळा असतो.
- एचआयव्ही बाधित मुले एकतर अनाथ किंवा एकल पालकत्व असणारी असल्यामुळे त्यांच्याबाबत समाजात उदासीनता जाणवते.
- समाजाची या मुलांबाबत अस्वीकृतीची भावना दिसून येते, त्यामुळे या मुलांना योग्य स्थान मिळत नाही.

**मुख्याध्यापक यशोगाथा**
**मुख्याध्यापकाचे नाव:- श्री. जगदीश कृष्णा टोले**
**शाळेचे नाव:- नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. २८, वाशी**

श्री. जगदीश कृष्णा टोले हे मूळचे बेलापुर गावातील स्थानिक नवी मुंबई, जि. ठाणे येथील रहिवासी असून माहे डिसेंबर १९८५ मध्ये प्रथमत: शिक्षक या पदावर मराठी माध्यम शाळेत रुजू झाले. २२ जून २०२० ला मुख्याध्यापक या पदावर पदोन्नतीने या शाळेत त्यांची नेमणूक झाली. रुजू होण्यापुर्वी या शाळेत एचआयव्ही बाधित मुले शिक्षण घेत आहेत, याची पूर्व कल्पना त्यांना होती. शाळेत रुजू झाल्यानंतर शाळेतील प्रभारी मुख्याध्यापक श्री. नंदकुमार लक्ष्मण पाटील यांनी बाधित मुलांविषयी सरांना माहिती दिली. ही मुले सन २०१२-१३ पासून स्वयंसेवी संस्थेमार्फत वयानुरूप इयत्ता पहिली ते आठवी पर्यन्त वर्गात प्रवेश घेतात. मुलांची बुद्धिमत्ता चांगली असून ते शाळेतील विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतात. एचआयव्ही हा संसर्गजन्य स्पर्शाने होणारा आजार नसल्याने इतर मुले व शिक्षक ही त्यांच्याशी सहकार्याने वागतात अशी माहिती दिली.

मुख्याध्यापक श्री. टोले सरांनी या मुलांबाबत माहिती घेतल्यानंतर, सर्वप्रथम त्यांनी ज्या संस्थेमार्फत ही मुले शाळेत दाखल होतात, त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्याकडून एचआयव्ही संदर्भात व या मुलांच्या आरोग्यासंदर्भात इत्यंभूत माहिती काढून घेतली. या आजाराबाबत सरांच्या मनात जी चुकीची संकल्पना होती, ती कमी झाली. या मुलांबाबत माहिती घेतल्यानंतर या मुलांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन सकारात्मक झाला आणि या मुलांसाठी मुख्याध्यापक व माणुसकी या नात्याने काम करायचे ठरविले व त्यांच्याकडे विशेष लक्ष द्यायचे निश्चित केले. सन २०२१-२२ मध्ये एकूण नऊ एचआयव्ही बाधित मुले या शाळेत शिकत आहेत. या मुलांच्या शारिरीक व बौद्धिक विकासासाठी आपल्याला काय करता येईल याचा विचार केला. तसे हे काम करणे फारच अवघड होते. कारण एचआयव्ही संदर्भात सर्वांच्या मनामध्ये थोडीफार भीती होती. ही मुले कशी वागतील, शिक्षक आणि इतर मुले यांचा या मुलांशी समन्वय कसा

साधला जाईल, असे अनेक प्रश्न सरांच्या मनामध्ये निर्माण झाले होते. श्री. पाटील सर यांनी यापूर्वी काम केलेले असल्याने त्यांच्या सहकार्याने पुढे काम करण्याचे ठरविले.

सर्वप्रथम माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, साधनव्यक्ती व समावेशित साधनव्यक्ती यांना सभेसाठी बोलावण्यात आले . त्यांच्याकडून या मुलांबाबत माहिती घेतली. विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या प्रकारापैकी बाविसाव्या प्रकारात ही मुले येतात, अशी माहिती समावेशित साधनव्यक्ती यांनी दिली. त्याचबरोबर या मुलांसाठी शासनाच्या / NGO यांचेमार्फत काही योजना आहेत असेही त्यांनी सांगितले. त्यानंतर त्या शाळेतील एका शिक्षकाने त्यांच्या वर्गात शिकत असलेल्या या मुलांबाबत माहिती दिली. तसेच या मुलांसाठी आपल्याला विविध कार्यक्रम घेता येतील. असेही त्यांनी सांगितले. सर्वांशी चर्चा केल्यामुळे सरांच्या मनातील भीती कमी झाली. आपण सर्व मिळून या मुलांसाठी काम करू असे सर्वांनी आश्वासित केले. या मुलांबाबत असलेल्या समस्या व त्यांच्यामध्ये असलेले गुण याबाबत चर्चा केल्यानंतर असे लक्षात आले की, ही मुले थोडी शांत आणि औषधांमुळे  थोडी ग्लानीत असतात. तसेच त्यांचे अवधान केंद्रीकरण जास्त वेळ टिकत नाही. ते सर्वांसोबत खेळतात, पण त्यांच्याच गटांमध्ये राहण्याचा प्रयत्न करतात. अभ्यासापेक्षा जास्त उपक्रमांमध्ये सहभाग घेतात. शाळेमार्फत दिला जाणारा पोषण आहार शक्यतो खात नाहीत. संस्थेमार्फत दिला जाणारा आहार किंवा डबा ते खातात.

वरीलप्रमाणे विविध समस्या या मुलांच्या बाबतीत जाणवल्याने तसेच त्यांनी मुलांचे निरीक्षण केल्यानंतर शिक्षक, विषय साधनव्यक्ती व समावेशित साधनव्यक्ती यांच्या सहकार्याने टोले सरांनी शाळेत विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केली.

१) **<u>आरोग्य शिबिर-</u>** समावेशित साधनव्यक्ती यांच्या सहकार्याने सर्व मुलांसाठी आरोग्यदायी शिबीर भरविण्यात आले. विशेष करून या मुलांची आरोग्य तपासणी करून घेण्यात आली.

२) **<u>पुर्व व्यवसाय कौशल्य-</u>** दिव्यांग बालकांसाठी घेण्यात आलेल्या उपक्रमांमध्ये या विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात आला. उदा. पणत्या बनवणे, तोरण बनवणे, पेपर बॅग बनवणे, उटणे तयार करणे, संक्रातीचे सुशोभित वाण बनवणे.

३) **<u>०३ डिसेंबर जागतिक सप्ताह दिन (समान संधी दिन)-</u>** लायन्स क्लब मार्फत नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच ऑलिम्पिक स्तरावरील प्रशिक्षकांकडून विविध क्रीडा स्पर्धा संदर्भात मार्गदर्शन घेण्यात आले. गोळा, भाला फेक, धावणे, पोहणे या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत या मुलांनी सक्रिय सहभाग घेतला.

४) **<u>नवी मुंबई म. न. पा. मार्फत वस्तूंचे वाटप-</u>** नवी मुंबई महानगरपालिका मार्फत शाळेतील मुलांची उपस्थिती व गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रत्येक बालकास दोन गणवेश, दोन प्रकारचे शूज, वही, रेनकोट, मास्क, सॅनीटायझर इ. वस्तूंचे वाटप केले जाते.

५) **<u>स्वयंसेवी संस्थेमार्फत वस्तूंचे वाटप-</u>** मुख्याध्यापक व शिक्षक यांनी विविध स्वयंसेवी संस्थेसोबत संपर्क साधला व त्यांच्याकडून मुलांसाठी कंपास पेटी, वह्या व सॅनीटायझर इ. वस्तू मिळविल्या.

६) **<u>ऑनलाईन शिक्षणासाठी डेटा पॅक-</u>** कोरोना कालावधीमध्ये मुलांच्या ऑनलाइन शिक्षणास आवश्यक डेटा पॅकसाठी नवी मुंबई म.न.पा. कडून प्रती विद्यार्थी एक हजार रुपये वार्षिक दिले गेले.

७) **<u>सांस्कृतिक कार्यक्रम-</u>** या मुलांना विविध उपक्रमात व कार्यक्रमात समाविष्ट करून देण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

८) **<u>सहशालेय उपक्रम-</u>** रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, नाट्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अशा विविध शालेय उपक्रमांचे आयोजन केले व या उपक्रमात या मुलांचा सक्रिय सहभाग घेतला.

९) **<u>आरोग्य तपासणी-</u>** शाळेतील मुलांची दरवर्षी आरोग्य तपासणी केली जाते. या तपासणी अंतर्गत या मुलांच्या मेडिकल फाइल्स बघून त्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

१०) **शालेय सभा -** शाळा व्यवस्थापन समिती, पालक शिक्षक संघ व माता पालक संघ यांच्या नियमित सभा घेतल्या जातात. या सभेत, या मुलांचे संगोपन करणारे संस्थेचे प्रतिनिधि उपस्थित असतात.

११)**<u>मार्गदर्शन व समुपदेशन</u>**- मुलांची उपस्थिती वाढावी व त्यांनी विविध उपक्रमात सहभाग घ्यावा, यासाठी त्यांच्या गरजेनुसार मानसशास्त्रज्ञ यांच्याकडून मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले.

१२)नवी मुंबई म.न.पा. अंतर्गत सर्व शाळांमध्ये व्हर्च्यूअल क्लासरूम आहेत. या क्लासरूमचा वापर मुलांचे अध्ययन अध्यापन प्रभावी व्हावे यासाठी केला जातो.



**क्रीडा स्पर्धा उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग- क्षणचित्रे**



**सहशालेय उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग- क्षणचित्रे**

अशा विविध गुणवत्तापूर्ण उपक्रमामुळे या मुलांची शैक्षणिक प्रगती वाढलेली आहे. ही मुले नियमित शाळेत येतात. विविध कार्यक्रमात सहभाग घेतात. मुख्याध्यापक श्री. टोले सर व त्यांच्या शिक्षकांनी या मुलांसाठी केलेले कार्य निश्चितच गौरवास्पद आहे. तसेच सर्वांसाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहे.

**चिंतनात्मक प्रश्न**

१. एचआयव्ही बाधित मुलांसाठी काम करत असताना श्री. टोले सर व त्यांच्या शिक्षकांसमोर असलेल्या आव्हानांची यादी करा.

२. एचआयव्ही बाधित विद्यार्थी तुमच्या शाळेत वर्गात दाखल झाल्यास, तुम्ही मुख्याध्यापक / शिक्षक म्हणून काय कराल ?

३. एचआयव्ही बाधित मुलांच्या शैक्षणिक विकासाबाबत काम करण्यासाठी कोणत्या नेतृत्व कौशल्याची गरज आहे असे आपणास वाटते.

**विचार करूया, चर्चा करूया**

१. तुम्ही मुख्याध्यापक असलेल्या शाळेत काही एचआयव्ही बाधित मुले शिक्षण घेत आहेत. मुलांच्या मस्तीखोरपणामुळे एक एचआयव्ही बाधित मुलगा पडला व त्याला जखम होऊन रक्तस्राव सुरू झाला. अशा परिस्थितीत तुम्ही काय कराल.

२. एचआयव्ही बाधित मुले असलेल्या शाळेत तुमची मुख्याध्यापक म्हणून बदली झाली आहे. या आजाराबाबत तुमच्या मनात भीती आहे. त्याबाबत काम करण्याचा अनुभव नाही. अशा परिस्थितीत तुमची काम करण्याची दिशा काय असेल, केवळ मुद्दे लिहा.

**एचआयव्ही बाधित विद्यार्थ्यांसोबत काम करताना असेही करता येईल**

१. सर्व एचआयव्ही बाधित विद्यार्थी शाळेत दाखल होतील यासाठी विशेष मोहीम हाती घ्यावी.

२. एचआयव्ही आजाराबाबत शिक्षक, पालक व समाज यांच्यात जनजागृती निर्माण करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे. उदा. भूमिका अभिनय, नाटक, पोस्टर, खेळ इ.

३. ०१ डिसेंबर एड्स दिन दिवशी या आजाराबाबत डॉक्टर, विविध आरोग्य तज्ञांचे व शिक्षण तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करावे .

४. शाळा व्यवस्थापन समितीमध्ये स्वीकृत सदस्य म्हणून या मुलांची निवड करावी व त्यांना शालेय कामकाजात समाविष्ट करावे.

५. वेळोवेळी या विद्यार्थ्यांना त्यांच्या विविध समस्यांबाबत मार्गदर्शन व समुपदेशन करून त्यांचे निवारण करणे.

६. या विद्यार्थ्यांना पोषण आहाराबाबत सहकार्य करण्यासाठी विविध स्वयंसेवी संस्थांची मदत घेणे.

७. एचआयव्ही बाधित विद्यार्थी व इतर विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रिया वाढविण्यासाठी विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करावे. उदा. वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा इ.

८. अध्ययन शैलीनुसार व गरजेनुसार अध्ययन व अध्यापन करून त्याचे मूल्यमापन करावे.

९. बालसाहित्य लेखन प्रकाशित करून एचआयव्ही आजाराबाबत जागृती करता येईल .

१०.या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करावे, त्यासाठी या विद्यार्थ्यांना वेगवेगळया गटात समाविष्ट करून नेतृत्वाबाबतच्या जबाबदाऱ्या द्याव्यात.

**एचआयव्ही बाधित विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विविध योजना**

१. दिव्यांग बालकांना लागू असलेल्या सर्व योजना (प्रकार २२)
२. बाल संगोपन योजना
३. संजय गांधी निराधार योजना
४. अन्न सुरक्षा योजना




**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० त्या अनुषंगाने एचआयव्ही बाधित विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या संदर्भाने केलेले विचार**

नवीन शैक्षणिक धोरणात सर्वच परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाणे आवश्यक आहे . यासाठी ऐतिहासिक दृष्टीने उपेक्षित , वंचित आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. शिक्षण हे समता सुनिश्चित करण्याचे एक उत्तम माध्यम आहे, ज्याद्वारे समाजात समानता, समावेशकता आणि सामाजिक – आर्थिक गतिशीलता मिळू शकते. अशा गटांसाठी सर्व मुलांसाठी पूर्वापार अडथळे असले तरी, या गटातील विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन यथोचित प्रगती करतील यादृष्टीने निश्चित पाऊले उचलली गेली पाहिजे असे धोरणाच्या प्रस्तावनेत नमूद केले आहे.

**समन्यायी आणि समावेशित शिक्षण : सर्वांसाठी शिक्षण**

- जन्म परिस्थिती किंवा पार्श्वभूमी यांमुळे कुठलेही मुल शिकण्याची आणि प्रगती करण्याची संधी गमावणार नाही.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विशेष गरजा असणाऱ्या (CWSN) किंवा दिव्यांग मुलांना इतर सामान्य मुलांसमान गुणवत्तापूर्ण शिक्षण प्राप्त करण्याची संधी देणारी सक्षम यंत्रणा निर्माण करणे.
- विशेष गरजा असणाऱ्या मुलांना पायाभूत स्तरावरून उच्च शिक्षणापर्यंतच्या नियमित शिक्षण प्रक्रियेमध्ये पूर्ण रूपाने सहभागी होण्यासाठी सक्षम केले जाईल .
- विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठी अडथळे मुक्तः शिक्षण आणि भौतिक सुविधांची सुनिश्चिती केली जाईल. वर्गातील सर्व उपक्रमात त्यांचा सहभाग सुनिश्चित केला जाईल.

**या मोड्यूलची शालेय नेतृत्व व शिक्षकांच्या दृष्टिकोनातून उपयुक्तता**

दिव्यांग व्यक्तींचा अधिकार अधिनियम २०१६ व आर.टी.ई . २००९ नुसार विशेष शैक्षणिक गरजा असणाऱ्या बालकांमध्ये कोणताही भेदभाव न करता समावेशित शिक्षणाद्वारे सर्व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याबाबत नमूद केले आहे. दिव्यांग बालकांचे एकवीस प्रकार निश्चित केलेले असून बाविसावा इतर आजार हा प्रकार येतो. त्या प्रकारात विविध आजार नमूद केलेले आहेत. त्यापैकी एक आजार म्हणजे एचआयव्ही होय. एचआयव्ही बाधित असलेल्या विद्यार्थ्यांना विविध सुविधांबाबत शालेय नेतृत्व व शिक्षकांना कल्पना नसते, अशा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून शिक्षण देणे हे फार महत्त्वाचे आहे. या मोड्यूलमुळे इतर आजारात मोडणाऱ्या विद्यार्थ्यांकडेही लक्ष देणे गरजेचे आहे, हे लक्षात येईल. या मोड्यूलचा उपयोग अशा विविध आजारातील मुलांसाठी काम करणाऱ्या नेतृत्वाला व शिक्षकाला निश्चितच होणार आहे.

- बालकांचा मोफत व सक्तीचा हक्क अधिनियम २००९ ची प्रभावी अंमलबजावणी
- दिव्यांग व्यक्तीचा अधिकार अधिनियम २०१६ ची प्रभावी अंमलबजावणी
- एचआयव्ही बाधित मुलांकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन विकसित होईल.
- एचआयव्ही बाधित मुलांना शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध होईल.

- विशेष गरजा असणाऱ्या मुलांपैकी बाविसाव्या प्रकारात मोडणाऱ्या मुलांबाबत शिक्षकांना व मुख्याध्यापकांना माहिती होईल.

**समारोप –**

विशेष गरजा असणाऱ्या बालकांपैकी एचआयव्ही बाधित मुलांसाठी काम करणे हे फार संवेदनशील व जिकीरीचे आहे. या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हे शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी आव्हानात्मक आहे. अशी बालके शाळेत येतात अशी माहिती इतर बालके व पालकांना झाल्यास बरेचवेळा त्यांचा रोष ओढवून घ्यावा लागतो व त्यांचा परिणाम शाळेच्या उपस्थिती व पट नोंदणीवर होतो. तरीही अशी परिस्थिती लक्षात घेवून त्या मुलांसाठी काम करणारे अनेक शिक्षक व मुख्याध्यापक आहेत. त्याच परिस्थितीची जाणीव ठेवून त्या मुलांच्या शैक्षणिक विकास व प्रगतीसाठी झटणारे टोले सर व त्यांचे शिक्षक वर्ग यांचे कार्य अनन्यसाधारण आहे. श्री. टोले सरांसारखे इतर मुख्याध्यापकांनी ठरवले तर अशा अनेक मुलांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण निश्चित मिळू शकते.

**संदर्भ सूची-**


1) शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम, पूरक वाचन साहित्य, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था,(मिपा), औरंगाबाद.
2) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020
3) शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण – २०१७/(११८/१७)/एस.डी.६, दिनांक १६ ऑक्टोंबर २०१८
4) बालकांचा शिक्षण हक्क कायदा २००९


## Website –


**1)** http://mr.vikaspedia.in/health
**2)** http://mr.vikaspedia.in/social.welfare
**3)** https://www.myupchar.com/mr/disease/एचआयव्ही-aids
**4)** https://mahasacs.org
**5)** www.childrenforhealth.org
**6)** www.desiressociety.org


**Youtube Link-**


**1)** https://youtu.be/VC-a0RGiRq4
**2)** https://youtu.be/DzXgCW9YcNg



| मोड्यूल विकसक | समन्वयन | मार्गदर्शक |
| --- | --- | --- |
| **डॉ.प्रभा खरटमोल,**<br>अधिव्याख्याता<br>जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था<br>ठाणे | डॉ.ज्योती कुलकर्णी<br>समन्वयक<br>महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | श्री.रमाकांत काठमोरे<br>संचालक<br>महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |